**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, AUG-SEPT, 2019, VOL- 7/35*

# पीडित महिलांच्या जीवनकौशल्याच्या विकसनात शिक्षकांची भूमिका

## सुकन्या पु. भाटे

*(निवृत्त, प्राचार्य), मुळा एज्युकेशन सोसायटीचे इंग्रजी व मराठी माध्यमाचे डी.एड. कॉलेज, वडगाव गुप्ता,अहमदनगर.* sukanyabhate@gmail.com

**Abstract**

*आजच्या जागतिकीकरण, उदारिकरण आणि खासगीकरणाच्या युगात गुणवत्ता हा शब्द परवलीचा झाला आहे. तंत्रज्ञान संस्कृतीचा उदय झालेला आहे. त्यामुळे स्त्रियांपुढे खुप मोठी आव्हाने आहेत. समाजामध्ये पीडित महिलांचा एक मोठा गट आहे आणि या पीडित महिलांच्या जीवन कौशल्यांचा विकास अत्यावश्यक आहे. स्नेहालयाचे संचालक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे सामाजिक चळवळीची व्याप्ती वाढली पाहिजे. या चळवळीपासून सुशिक्षित व पांढरपेशा वर्ग दूर पळून चालणार नाही. सामजिक आव्हाने पेलणाऱ्या तरूणांना समाजाचे पाठबळ आवश्यक असते. तरूणांनी कष्टातून उभारलेल्या सामाजिक चळवळीच्या तीर्थक्षेत्रातच देव शोधण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे भारत देशाचे महासत्ता होण्याचे स्वप्न पूर्ण होईल. शाळा—कॉलेज समाजाचा एक भाग आहे. यासाठी पीडित महिलांच्या विकसनासाठी अध्ययन—अध्यापन संशोधन, प्रशिक्षण व विकास ह्या संदर्भात आपली गुणवत्ता सिध्द करणे ही काळाची गरज आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:—**

आज शाळा—कॉलेजमधून जे शिकवले जाते त्याला शिक्षण म्हणण्याची प्रथा आहे. आणि हे शिक्षण गतीच्या विरूध्द झालेले आहे ही आपली खंत आहे. शिक्षणाकडे रचनावादी दृष्टीकोनातून पाहिले तर लक्षात येते की शिक्षणाचा पाया हा मानसशास्त्र आहे. मानसशास्त्राला आधारभूत असलेली शरीर विज्ञान आणि मेंदूविषयक शास्त्र ही शिक्षणाचा पाया ठरवित असतात आणि संशोधनानुसार त्यात बदलही होत असतात.

व्यक्तीने कसे शिकावे? याची दिशा ठरविण्याचे काम संशोधन करते. पण काय शिकायचे? म्हणजेच शिक्षणाचा आशय काय असते, त्या अर्थाने शिक्षणाचा आशय ठरवावा लागतो. म्हणजेच शिक्षण हे भावी काळाला सामोरे जाणारे असावे लागते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१९४४ च्या सार्जंट समितीपासून ते १९६४—६६ च्या कोठारी कमीशन पर्यंत आणि नंतरच्या १९८६ च्या शैक्षणिक धोरणापर्यंतच्या पासून ते २००९ च्या RTE च्या धोरणापर्यंत सर्वच समित्यांनी सुधारणा सुचवत शिक्षण प्रवाही ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही शिक्षण हे पुरेसे गतिमान झाले नाही.

गतिमानता हा शिक्षणाचा अविभाज्य गुण असायला पाहिजे तसेच शिक्षण हे बदलत्या सामाजिक वास्तव बदलण्याच्या दिशेने वेगाने गेले पाहिजे. शिक्षित होणे म्हणजे आजूबाजूच्या जगाचा शोध घेणे त्याचबरोबर ते जरूरीप्रमाणे बदलण्याचे सामर्थ्य प्राप्त करणे, अशा तऱ्हने व्यक्तीला शिक्षित करणे शिक्षणाला जमत नाही ते शिक्षण गतीच्या विरूध्द जाणारे शिक्षण होय.

देशाच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्वाची आहे. पीडित महिलांना आत्मनिर्भय बनवणे गरजेचे आहे. त्यांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. शिक्षण न मिळण्याची पीडित महिलांची वेगवेगळी कारणे आहेत. दारिद्र्य, घरगुती कौटुंबिक समस्या, दुर्धर आजार, अज्ञान, अंधश्रध्दा, रूढींचा व परंपरांचा पगडा, सतत हीनपणाची वागणूक अशा अनेक समस्या सोडविण्यातच त्यांचा वेळ वाया जातो.

आपण आयुष्यात यशस्वी व्हावे असे प्रत्येकालाच वाटत असते. यशस्वी, आनंददायी व शांतीप्रिय, निरोगी जीवनाचा लाभ आपल्याला मिळावा अशी सूप्त इच्छा प्रत्येकाच्याच मनात असते पण सध्याच्या काळात सर्वांनाच विविध स्तरावरील स्पर्धेला, ताणतणावांना तोंड द्यावे लागते. पीडित महिलांना तर विभक्त कुटुंबे, न्यूनगंड, चिडखोरपणा, एकटेपणा, गुन्हेगारी प्रवृत्ती, अस्वस्थता, भीती अशा अनेक चिंतांनी ग्रासलेले असते. त्यामुळेच या शोधनिबंधातून त्यांच्या जीवन कौशल्य शिक्षणाचा मानसिक, भावनिक समस्येतून विचार करता येईल.

**शोध निबंधाचा उद्देश—**

१. पीडित महिलांची जीवन कौशल्यांची संकल्पना स्पष्ट करणे.

२. पीडित महिलांचा शैक्षणिक व सामाजिक क्षमतांचा सहभाग तपासून पाहणे.

३. शासकीय व शैक्षणिक स्तरावरून पीडित महिलांच्या शिक्षणाचा आढावा घेणे.

**विश्लेषण—**

**जीवन कौशल्य संकल्पना—**

**जीवन कौशल्य शिक्षणाचा आशय—**

**WHO – जागतिक आरोग्य संघटना—** १९९९ मध्ये या संदर्भात असे म्हटले आहे की, Life skill education s designed to facilitate the mentally appropriate way it contraries to the promotion of personal and social development, the prevention of health and social problems and the protection of human rights- WHO 1999

जीवन कौशल्य शिक्षणाची रचना अशा पध्दतीने झाली पाहिजे की त्यामधून मानसिक कौशल्य विकसनासाठी योग्य सांस्कृतिक व विकसित मार्गाचा अवलंब करून अधिक सराव व प्रेरणा दिली गेली पाहिजे. त्यामधून मानवी हक्कांचे संरक्षण होऊन आरोग्यविषयक सामाजिक समस्यांपासून दक्षता घेवून वैयक्तिक व सामाजिक विकासाला चालना मिळाली पाहिजे.

पीडित महिलांच्या शिक्षणामध्ये अशा जीवन कौशल्यांचा अंतर्भाव झाला पाहिजे की ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुखकर होईल व त्या शिक्षणामुळे जगण्यातील ताणतणावांवर मात करता येईल.

**पीडित महिलांच्या शिक्षणातील समस्या—**

चार्ल फेरिअर यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्या राष्ट्राकडून स्त्रिला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्वावरून त्या राष्ट्राची उंची मोजता येते. म्हणून स्त्रियांना शिक्षण देणे महत्वाचे आहे.

१. स्त्रियांना दुय्यम स्थान

२. दारिद्र्य

३. बालविवाह

४. शिक्षण अर्धवट सोडणे

५. पालकांचे अज्ञान

६. परंपरा, चालीरीती, रूढी, अंधश्रध्दांचा प्रभाव

७. घरकाम, अर्थार्जनासाठी काम

८. सुशिक्षित बेकारीमुळे निराशा

९. सतत कुचंबना, अवहेलना

१०.अभ्यासक्रमातील दोष

११.स्त्रियांसाठी सोयीसुविधांचा अभाव

१२.दोषपूर्ण प्रशासन

१३.उच्च शिक्षणापर्यंत न पोहोचणे

१४.शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशनाचा अभाव

१५.शासनाच्या सोई सुविधांचा अभाव

१६.स्त्रियांचा वैयक्तिक अडचणी समजून घेतल्या जात नाहीत

१७.जीवनोपयोगी व व्यावसायिक शिक्षणाची कमतरता

१८.मुलींना भावनिक पातळीवर समजून न घेणे

१९.पालकांमध्ये जागृती नाही

२०. स्त्रियांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव

पीडित स्त्रियांना स्वत:च्या व्यक्तिमत्व विकासासाठी, निरोगी शरीर, हक्काची व कर्तव्याची जाणीव होऊन आत्मविश्वास, आत्मप्रतिभा वाढविणे गरजेचे आहे.

**पीडित महिलांसाठी जीवन कौशल्ये:—**

जागतिक आरोग्य संघटनेनेच सांगितलेले ही दहा जीवन कौशल्ये पीडित महिलांच्या जीवनातील घडामोडीवर सकारात्मक परिणाम घडवून आणू शकतील.

**१. स्व—जाणीव किंवा स्वयंजागृती:—**

प्रत्येक पीडित महिलेला स्व—जाणीव करवून देणे, कितीही अनिश्चित व तणावपूर्ण परिस्थिती असेल आणि जर आत्मविश्वास असेल तर पीडित महिलेला स्वत:चा विकास साध्य करण्यास मदत होते. ती स्वत:च्या क्षमत ओळखते, निर्णय घेण्याची सवय वाढवते, स्वत:मधील शक्तीला ओळखून ती जीवनात काहीतरी प्राप्त करून घेण्याची धडपड करते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२. पीडित महिलेची सह—संवेदनाः—**

पीडित महिला जीवन कौशल्यातील लहानात लहान प्रश्न सुध्दा काळजीपूर्वक व अधिक समजुतदारपणाने जाणून घेतात इतर सर्व परिस्थितीचा अंदाज घेतात. इतरांच्या भिन्नतेची जाणीव करवून घेतात. त्यामुळे एक नवीन विश्वास निर्माण होता.

**३. पीडित महिलांच्या समस्यांचे निराकरणः—**

स्वतःच्या अडचणी व अनिश्चितता यातून मार्ग काढण्याच्या कौशल्याचा अंतर्भाव 'समस्या निराकरण' या कौशल्यामध्ये होतो. पीडित महिलांनी येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यावर सरळपणे व योग्य साधनांचा उपयोग करून घेतल्यास यशस्वीता निर्माण होते. आत्मविश्वासाच्या आधारे आत्मनिर्भर होणे स्वतःच्या जीवनातील झालेल्या चुकांचा, समस्यांचा शोध घेवून निराकरण करणे आत्मविश्वास वाढवणे.

**४. पीडित महिलांची निर्णय क्षमताः—**

निर्णय म्हणजे सारासार विचारानंतर एखादी गोष्ट करण्यासाठी केलेला निश्चय होय. अनेक बाजूंचा विचार करून स्त्रीपुढे निर्माण झालेल्या समस्येत प्राप्त परिस्थितीत काहीना काही पर्याय हे असतातच यातूनच प्राप्त परिस्थितीत योग्य विचार करून निर्णय घ्यावा लागतो व स्वतःच्या क्षमतेनुसार चांगला पर्याय निवडावा लागतो. याद्वारे स्वतःच्या आयुष्यावर, गुणवत्तेवर सकारात्मक बदल घडून येतो.

**५. पीडित महिलांचा सुसंवादः—**

पीडित महिलांनी विचारांची अशाप्रकारे देवाण—घेवाण केली पाहिजे की त्याद्वारे आपले म्हणणे, विचार इतरांपर्यंत पोहोचविता येतील तर आपल्या समस्या समाजापुढे मांडल्या नाही तर त्याच्या नकारात्मक परिणात त्यांच्या मनावर होतो. अशा नकारात्मकतेतून व्यक्ती आत्मविश्वास हरवून बसते. स्वतःच्या व इतरांच्या बद्दल हीनतेची भावना मनात निर्माण होते. सुसंवाद ही जरी जटील व गुंतागुंतीची प्रक्रिया असली तरीही संवादाद्वारे आपली बोलण्याची हातोटी आपली मनःस्थिती इतरांच्या लक्षात येईल अशी भाषाशैली वापरून सुसंवाद घडविते म्हणून सुसंवाद हा माहिती कौशल्यासाठी भरीव परिणाम साधत असतो.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**६. पीडित महिलांचे आंतरमानवीय व्यवहारः—**

व्यक्ती व्यक्तीमधील परस्पर सन्मान, त्याबद्दलची निष्ठा व प्रामाणिकपणा यावर आंतरमानवीय व्यवहार अधिक मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. त्यातूनच एकमेकांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते. जर आंतरमानवीय व्यवहार ताण—तणावापासून मुक्त असतील तर सर्वजण एकमेकांचा आदर करतात व एकमेकांच्या गरजा पूर्ण करू शकतात. यातूनच परस्परांच्या विचारांचा आदर वाढीस लागतो. समाधानकारक वर्तन घडते व प्रतिकूलता नष्ट होऊन त्यावर अनुकूलतेची मात होते.

**७. पीडित महिलांचे सृजनात्मक विचारः—**

सृजनात्मक विचार करणे म्हणजे विविध समस्यांचे चिंतन करणे होय. नवीन विचारांची निर्मिती ही मनातील एकटेपणाची जाणीव नष्ट करते. आत्मनिर्भयता वाढवते. नवीन विचाराद्वारे समस्यांचे निराकरण होण्यास मदत होते. पीडित महिलांना विविध गुंतागुंतीच्या परिस्थितीतून मार्गक्रमण करावे लागते म्हणून विविध समस्यांचे आकलन होणे गरजेचे असते या सृजनात्मक चिंतन विचाराने व्यक्ती जास्त सामाजिक, प्रेमळ व प्रामाणिक बनते. आत्मनिर्भयता वाढीस लागते. आनंददायी शिक्षणाचा लाभ मिळतो.

**८. पीडित महिलांचे चिकित्सात्मक विचारः—**

पीडित महिलांना समस्यांचे निराकरण करण्यासाठी साधक—बाधक विचाराची गरज असते. स्वतःच्या जीवनातील अनुभव, मान्यता, दृष्टीकोन व माहितीचे पृथ्थकरण याचा चिकित्सात्मक विचारात समावेश होतो. योग्य तर्कपूर्ण निर्णय घेता येईल. स्वतः विचार करून आत्मनिर्भयता प्राप्त होईल. याप्रकारे चिकित्सात्मक विचार येथे अभिप्रेत आहे.

**९. पीडित महिलांच्या भावनांचे निराकरणः—**

पीडित महिलांना प्रेरणा मिळते तसेच त्यांच्या वागण्या बोलण्यात अनुकूलता निर्माण होते. भावनिक संवेदनामुळे प्रेरणा मिळते. भावनिक अनुकूलता निर्माण झाल्याने

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सामाजिक, बौध्दिक आणि नैतिक गुणवत्ता प्राप्त होते हेच भावनिक अनुकूलनाचे महत्व होय.

**१०. पीडित महिलांच्या तणावाचे निराकरणः—**

वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे, आव्हानांमुळे आणि काल्पनिक भीतीमुळे स्त्रियांच्या शरीरामध्ये व मनामध्ये जे बदल घडून येतात, त्यांना ताण असे म्हणतात. अपेक्षित बाबी वास्तवात न आल्यास तणावग्रस्त स्थिती निर्माण होते. भूतकाळातील गोष्टींचा विचार केल्यास निराशा वाटते. याउलट भविष्यकाळातील गोष्टींची चिंता केली तर ताण निर्माण होतो. सामान्य ताणतणाव जेव्हा मोठ्या प्रमाणात निर्माण होतात तेव्हा ते अधिक तिव्र बनतात. शरीराला मनाला घातक ठरतात. म्हणून तणाव दूर करण्यासाठी परिस्थितीत बदल घडवून आणावा लागतो, तणावाची कारणे शोधून त्यावर सकारात्मक उपाययोजना करावी लागते. सुसंवादाद्वारे तणावाचे निराकरण करता येते.

**जीवन कौशल्य विकसन व पीडित महिलाः—**

भारतीय समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीवर नेहमीच लिहिले जाते, चर्चा केल्या जातात. त्यामध्ये प्रसारमाध्यमे नेहमीच प्रसार करतात की आज भारतातील स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहेत. या प्रचारामुळे स्त्रियांचा विकास झाला असा भ्रम निर्माण होतो. हजारो वर्षे विकासापासून वंचित असलेली बहुजन समाजातील स्त्रियांची परिस्थिती आजही बदललेली नाही. जातीव्यवस्था, अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे स्त्री ही कायम मागासलेली आहे. आजही शिक्षण, रोजगार, आरोग्याच्या सुविधा व अनेक मुलभूत अधिकारापासून स्त्री वंचित आहे. पीडित स्त्रियांसाठी समाजाचे व शिक्षणाचे प्रतिनिधित्व वाढवत नेऊनच पीडित व शोषित समस्त स्त्रियांचा विकास घडवून आणण्याचे काम करावे लागेल हे सत्य स्वीकारावे लागेल.

**शिक्षकाची भूमिका —**

- स्त्रियांच्या शिक्षणासाठी पालकांचीच मानसिकता बदलणे आवश्यक आहे. जेणेकरून स्त्रियांच्या शिक्षण खंडीत होणार नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- मुलींच्या सुरक्षिततेसाठी नियम हवेत, त्याची कडक अंमलबजावणी करावी. स्त्रियांना न्याय मिळवून द्यावा.
- मुलींना व्यावसायिक शिक्षणासाठी, स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिक उत्पन्न मिळविण्याची क्षमता निर्माण करावी.
- शिक्षकांनी स्त्रियांना मुलींना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. उदा. उद्योगांना भेटी देणे, तज्ज्ञांच्या मुलाखती घेणे.
- शिक्षकांनी शासकीय योजनांची माहिती स्त्रियांना द्यावी.
- ग्रामीण, शहरी समस्या व अडचणी वेगवेगळ्या आहेत त्या समस्यांवर शिक्षकांच्या संशोधनाची गरज आहे.
- शालेय स्तरापासूनच विद्यार्थी दशेमध्ये अपयशांवर मात करण्याची सवय लावावी.

**निष्कर्ष—**

१. पीडित महिलांचा विकास प्रक्रियेत सहभाग निर्माण व्हावा असे शिक्षण मिळावे.
२. पीडित महिलांची स्व—संकल्पना जागृत करावी
३. ग्रामीण देववाद, अंधश्रध्दा, दारिद्र्य, निरक्षरता या समस्या दूर करणारे शिक्षण निर्माण व्हावे.
४. पीडित महिलांवरील होणारे अन्याय दूर करण्यासाठी कडक नियमांची व कायद्यांची अंमलबजावणी करावी.
५. पीडित महिलांना आत्मनिर्भय बनवून राष्ट्र निर्मितीसाठी व देशाच्या विकासासाठी उपयोगी स्वयंरोजगार निर्माण व्हावेत.

**संदर्भसूचीः—**

*Dr. Patel Manoj, 2010, 21st Century Human Right and Education, Anand, Gujrat, Darpan Prakashan.*
*खरात आ. पा. १९८८, प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन*
*डॉ. भोसले रमा, डॉ. डोणे उज्वला, शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, कोल्हापूर, फडके प्रकाशन*
*प्रा. आवचर सीमा, २०१०, विशेष शिक्षण, पुणे, नित्यनूतन प्रकाशन*
*योजना मासिक अंक ५ वा डिसेंबर, २०१३*
*सकाळ अहमदनगर आवृत्ती, दि. १८ जानेवारी २०१४*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*